# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 06 April 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०६ एप्रिल २०२५ दुपारी १.०० वा.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज रामनवमीच्या पार्श्वभूमीवर तामिळनाडूत रामेश्वरम इथं भेट देणार आहेत. रामेश्वरम् शहराला मुख्य भूमीशी जोडणाऱ्या नवीन पंबन रेल्वे पुलाचं लोकार्पण त्यांच्या हस्ते थोड्याच वेळात होणार आहे. आकाशवाणीवरून या कार्यक्रमाचं थेट प्रसारण होईल.

समुद्रावर बांधलेला हा भारतातला पहिला व्हर्टीकल लिफ्ट म्हणजेच उभा वर उचलला जाणारा सागरी सेतू आहे. अभियांत्रिकी क्षेत्रातील चमत्कार मानला जाणारा ५५० कोटी रुपये खर्चुन बांधलेला हा सेतू, सुमारे दोन किलोमीटर लांबीचा असल्याची माहिती, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. रामेश्वरम् ते तांबरम् दरम्यानच्या रेल्वे सेवेलाही पंतप्रधान हिरवा झेंडा दाखवणार आहेत. या कार्यक्रमानंतर ते रामेश्वरमच्या रामनाथ स्वामी मंदिरात श्रीरामांची पूजा करतील त्यानंतर एका कार्यक्रमालाही ते संबोधित करतील. एकूण आठ हजार तीनशे कोटी रुपयांच्या या प्रकल्पाचं पंतप्रधानांच्या हस्ते उद्घघाटन आणि पायाभरणी होणार आहे.

****

केंद्रीय अल्पसंख्याक मंत्रालयानं वक्फ सुधारणा विधेयकाबाबतच्या गैरसमजुती दूर करणारं पत्रक जारी केलं आहे. १९९५च्या वक्फ कायद्यापूर्वीची कोणतीही मालमत्ता या कायद्यान्वये ताब्यात घेतली जाणार नाही. तसंच वक्फ बोर्डात मुस्लिमेतर सदस्य असतील, परंतु ते बहुसंख्येनं नसतील असं स्पष्ट करण्यात आलं आहे. केवळ स्वेच्छेने दान दिलेल्या मालमत्ताच वक्फ बोर्डाकडे वर्ग व्हाव्या आणि त्यांचं व्यवस्थापन पारदर्शी असावं याकरता हे विधेयक आणलं आहे, असं पत्रकात म्हटलं आहे. दरम्यान्, वक्फ सुधारणा विधेयकाला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल् रात्री मंजुरी दिली आहे. त्यामुळे या विधेयकाचं कायद्यात रुपांतर झालं आहे.

****

भारतीय जनता पक्ष आज आपला ४५वा स्थापना दिन साजरा करत आहे. यानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पक्ष कार्यकर्त्यांना शुभेच्छा देतांनाच देशाच्या प्रगतीसाठी अतुलनीय समर्पणाचा संकल्प करत विकसित भारताचं स्वप्न साकार करण्याचं आवाहन केलं आहे. भाजप अध्यक्ष आणि केंद्रीयमंत्री जगत प्रकाश नड्डा, गृहमंत्री अमित शाह यांनीही पक्ष स्थापना दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

****

राज्यातल्या शासकीय शाळांमध्ये केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ- सीबीएसईचा अभ्यासक्रम राबवल्यानं मराठी संस्कृती हरवली जाणार नाही, मराठी अनिवार्यच राहील, तसंच स्थानिक इतिहासही अभ्यासक्रमातून वगळला जाणार नाही, असं शिक्षण अभ्यासक सचिन जोशी यांनी म्हटलं आहे. यशवंतराव चव्हाण केंद्राच्या शिक्षण विकास मंचानं आयोजित केलेल्या 'महाराष्ट्राचा सीबीएसई पॅटर्न' या चर्चासत्रात ते काल बोलत होते. या बदलामुळे शिक्षणशुल्कात काहीही बदल होणार नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं. नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सगळ्यात आधी सीबीएसईच्या शाळांमध्ये सुरू झाली असून हा अभ्यासक्रम म्हणजेच राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण- एन.सी.ई.आर.टी.चा अभ्यासक्रम राबवणं आहे, असंही त्यांनी सांगितलं.

****

रामजन्मोत्सनिमित्त छत्रपती संभाजीनगर शहरातील विविध राम मंदिरात आज आरती, वाहन रॅली, शोभायात्रा, महाप्रसाद, कीर्तन तसंच विविध ठिकाणी गीत रामायणाचं आयोजन करण्यात आलं आहे. गोविंदसिंगपुरा, कैलासनगर, किराडपुरा, समर्थनगर इथल्या राम मंदिरातही विविध कार्यक्रम होत आहेत. दरम्यान, हिंगोली शहरातही आज सकाळी रामनवमी निमित्त भव्य शोभायात्रा काढण्यात आली. नांदेड नाकापासून निघालेल्या शोभायात्रेचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक इथं समारोप झाला.

****

नांदेडचं मध्यवर्ती बसस्थानक तात्पुरत्या काळासाठी कौठा मैदानावर स्थानांतरीत करण्यात येत असल्याची माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिली आहे. मध्यवर्ती बसस्थानकाला रेल्वेस्थानकापासून जोडणारा मुख्य रस्ता दुरुस्त करण्यासाठी मर्यादित कालावधीसाठी हा बदल करण्यात आला आहे. या नव्या निर्णयानुसार, १२ एप्रिलपासून जुनं बसस्थानक बंद करण्यात येणार आहे. संबंधित

यंत्रणेनं नियोजित वेळेआधीच रस्त्याचं काम पूर्ण करण्याचं आवाहन जिल्हा प्रशासनानं केलं आहे.

****

आदिलाबाद–नांदेड–अदिलाबाद गाडी क्रमांक १७४०९ आणि १७४१० ही इंटरसिटी एक्सप्रेस मालटेकडी–नांदेड–मालटेकडी दरम्यान अंशतः रद्द करण्यात आली आहे, अशी माहिती दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड कार्यालयानं दिली आहे.

****

क्रिकेट – आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज सनरायझर्स हैदराबाद आणि गुजरात टायटन्स यांच्यात सामना रंगणार आहे. हैदराबाद इथं सायंकाळी साडेसात वाजता सामना होईल. काल चेन्नईत

काल चंदीगड इथं झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सनं पंजाब किंग्जचा ५० धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना राजस्थाननं २०५ धावा केल्या. यामध्ये यशस्वी जयस्वालनं ४५ चेंडूत ६७ धावा केल्या. प्रत्युत्तरात, पंजाब किंग्जला १५५ धावाच करता आल्या. काल चेन्नईत झालेल्या दुसऱ्या सामन्यात, दिल्ली कॅपिटल्सनं चेन्नई सुपर किंग्जचा २५ धावांनी पराभव केला. १८४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, चेन्नई सुपर किंग्ज संघाला १५८ धावा करता आल्या.

****

हवामान

येत्या दोन दिवसांत कोकण आणि गोव्यातील काही भागात उष्ण आणि दमट हवामान राहील असा अंदाज पुणे वेधशाळेनं व्यक्त केला आहे, तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात हवामान कोरडे राहील.

****